44

I०५८

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** अंबड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0398 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/09/2024 23:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 03/09/2024
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/09/2024
**Time From (वेळेपासून):** 15:03 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/09/2024 **Time (वेळ):** 23:22 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 033
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/09/2024 23:22 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोलीस स्टेशन अंबड येथील,एका रुम मध्ये

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कृष्णा विनायक खरात

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | नारायणगांव कासारवाडी ताअंबड,जिजालना ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | नारायणगांव कासारवाडी ताअंबड,जिजालना ,अंबड ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8007401340

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रताप रेवाजी चव्हाण | | | 1. रानंदनवन कलनी, अंबड रोड, जाल,अंबड ,जालना,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 12,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 12,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
12,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
दिनांक 03.09.2024.
फिर्याद मी कृष्णा विनायक खरात वय 52 वर्ष व्यवसाय शेती रा.नारायणगांव (कासारवाडी) ता.अंबड जि.जालना मोबाईल नंबर 8007401340 ईमेल आयडी नाही.
समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 03.09.2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझ्या पत्नीचे मावसभाऊ नामे महादेव बबन निर्मळ हे माझ्याच गावात राहतात.
दिनांक 18.08.2024 रोजी पोलीस स्टेशन अंबड जि.जालना येथे मी, माझा मावस मेव्हणा महादेव निर्मळ व इतर 06 जणांवर गुन्हा रजिस्टर नंबर 379/2024 कलम 74 व इतर भारतीय न्याय संहिता 2023 प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा तपास हा पोलीस स्टेशन अंबड येथील पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेब यांच्या कडे आहे. त्यांनी मला, माझा मावस मेव्हणा महादेव निर्मळ व इतर 06 जणांना दिनांक 27.08.2024 रोजी पोलीस स्टेशन अंबड येथे बोलावुन आरोपी चेहरापटटी फॉर्म भरुन नोटीस दिली. त्यावेळी पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेब यांनी माझा माझा मावस मेव्हणा महादेव निर्मळ यांना पोलीस स्टेशन अंबड येथे आमच्यावर दाखल असलेल्या गुन्हयात मदत व तपास लवकर करुन चार्जशीट कोर्टात दाखल करण्यासाठी 15,000/-रुपयाची मागणी करुन लगेच माझ्या कडुन अॅडव्हास म्हणुन 3000/-रुपये घेतले व बाकी राहिलेले 12,000/-रुपये दोन तीन दिवसात पोलीस स्टेशन अंबड येथे आणुन देण्यास सांगितले.
दिनांक 28.08.2024 रोजी पासुन पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेब हे मला दररोज फोन करुन बाकी राहिलेले 12,000/-रुपये आणुन दया असे म्हणुन तगादा लावत होते. त्यामुळे मी कंटाळुन जावुन आज दुपारी पोलीस स्टेशन अंबड येथे येऊन तुम्हाला भेटतो असे सांगितले.
मला पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेब यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी कोणतीही वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांच्याशी माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर ते पोलीस स्टेशन अंबड येथे आमच्यावर दाखल असलेल्या गुन्हयात मदत व तपास लवकर करुन चार्जशीट कोर्टात दाखल करणार नाही.
मी आज दिनांक 03.09.2024 रोजी पोलीस स्टेशन तालुका अंबड येथे जावुन पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेब यांची भेट घेणार आहे. त्यावेळी पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेब यांनी माझ्या कडे लाच मागितल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. मी दिलेल्या लेखी तक्रारीवर मी, पंचानी व श्री. जाधवर साहेब यांनी सह्या केल्या.
मी पोलीस स्टेशन अंबड येथील पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय? त्या माझ्या कडे लाच मागतात काय? याची खात्री करण्यासाठी दिनांक 03.09.2024 रोजी श्री.जाधवर साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे सरकारी वाहनाने व(मी माझ्या कडील मोटार सायकलने रवाना होऊन जालना ते अंबड जाणारे रोडवरील पारनेर फाटया जवळील गजानन महाराज मंदीर परिसरात थांबलो. त्याठिकाणी श्री.जाधवर साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.जाधवर साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या पॅन्टच्या आतुन करदोडयाला व्हाईस रेकॉर्डर मशीन बांधुन मला पंच क्र.1 लाड यांचे सोबत माझ्या कडील मोटार सायकलने पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना भेटण्यासाठी पोलीस स्टेशन अंबड येथे पाठविण्यात



Scanned with CamScanner

आले. मी व पंच क्र.1 लाड असे आम्ही पोलीस स्टेशन अंबड येथे जावुन गाडी पार्किंग मध्ये उभी करुन पायी चालत पोलीस स्टेशनच्या आवारातील एका रुम मध्ये जावुन पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांची भेट घेतली.त्यावेळी माझी व पोलीस हवालदार प्रताप चव्हाण साहेबांची आपसात कामासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी प्रताप चव्हाण यांनी पंच क्र.1 लाड यांचे समक्ष मी तुमच्याकडं पाहुन काम केल मी असे म्हणाले असता मी त्या रोजी किती देलेते असे म्हणालो असता प्रताप चव्हाण तीन असे म्हणाले.त्यावर मी तीन हजार आता मग काय तेरा रायले का व्हय असे म्हणालो असता प्रताप चव्हाण हे बारा असे म्हणाले. त्यानंतर थोडया वेळाने मी किती दयायचे पटकन सांगा असे म्हणालो असता प्रताप चव्हाण दहा दोन बारा असे म्हणाले. त्यावरुन मी व पंच क्र.1 लाड असे आम्ही जालना ते अंबड जाणारे रोडवरील पारनेर फाटया जवळील गजानन महाराज मंदीर परिसरात परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.जाधवर साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.जाधवर साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये पोलीस हवालदार प्रताप चव्हाण हे पोलीस स्टेशन अंबड येथे आमच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत व तपास लवकर करुन चार्जशीट कोर्टात दाखल करण्यासाठी यापुर्वी 3,000/-रुपये स्विकारल्याचे मान्य करुन बाकी राहिलेले 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम लगेच पोलीस स्टेशन अंबड येथे स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

त्यावरुन पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांचे विरुध्द दिनांक 03.09.2024 रोजी पोलीस स्टेशन अंबड येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांच्या सूचने वरुन सरकारी वाहनात पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 24 नोटा एकुण 12,000/- रुपये रक्कमेला अँथ्रासीन पावडर लावली. सदरील अँथ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे समोरील डाव्या खिशात ठेवल्या. श्री.जाधवर साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांनी लाच स्विकारल्या नंतर पोलीस स्टेशनच्या आवारात येऊन बीडी पेऊन इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.बुजाडे यांना सापळा पथकातुन वगळुन पंच क्र.2 श्रीमती ढवळे यांच्या सोबत राहण्याची सुचना दिली. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर श्री.जाधवर साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या पॅन्टच्या आतुन करदोडयाला बांधुन दिली. मला व पंच क्र.1 लाड यांना पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना भेटण्यासाठी पोलीस स्टेशन अंबड येथे पाठविले. मी व पंच क्र.1 लाड असे आम्ही माझ्या कडील मोटार सायकलने अंबड येथील पोलीस स्टेशनच्या आवारात गेलो. माझ्या पाठीमागे श्री.जाधवर साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 यांचे सह सरकारी वाहनाने अंबड येथे पोलीस स्टेशनच्या परिसरात आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने परिसरात सापळा लावून थांबले.

मी पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना पोलीस स्टेशन अंबड येथील एका रुम मध्ये जावुन भेटलो. त्यावेळी पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांनी माझ्या सोबत असलेल्या पंच क्र.1 लाड यांना एका फाईल मधील कागदपत्र वाचुन दाखविण्यास सांगितले असता पंच क्र.1 लाड यांनी हम्म असे म्हणाले असता पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांनीच यांच्या कडील फाईल मधील काही कागदपत्र वाचुन दाखविले. त्यानंतर माझी व पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांची आपसात कामा संबंधी चर्चा झाली. त्यावेळी चर्चे दरम्यान मी माझ्या डाव्या हाताने पॅन्टच्या समोरील डाव्या खिश्यातुन अँन्थ्रासिन पावडर लावलेले 12,000/- रुपये काढुन पोलीस हवालदार प्रताप चव्हाण हयांचे समोर धरले असता त्यांनी किती हे असे म्हणुन त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या लाकडी टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवले. त्यावर मी मोजाना असे पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना म्हणालो असता ते म्हणाले की, भरोसा माणसावर करतो मी पैश्यावर नाही असे म्हणाले. त्यानंतर मी सदर रुम मधुन बाहेर जात असतांना प्रताप चव्हाण हे मला ये इकडं असे म्हणाले. त्यावर मी त्यांना मला बीडी पियाची ना असे म्हणुन रुम मधुन बाहेर येऊन ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ दुपारी अंदाजे तीन वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्र.2 श्रीमती ढवळे यांचे सह त्या ठिकाणी आले. श्री.जाधवर साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांनी पंच क्र.1 लाड यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 लाड यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमा कडे अंगुली निर्देश करुन हेच पोलीस हवालदार प्रताप चव्हाण असुन हयांनी तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या लाकडी टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवले आहे असे सांगितल्याने पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना पंचा समक्ष



Scanned with CamScanner

लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव प्रताप रेवाजी चव्हाण वय 56 वर्षे व्यवसाय नोकरी पोलीस हवालदार ब.न.1048 नेमणुक पोलीस स्टेशन अंबड रा. नंदनवन कॉलनी, अंबड रोड, जालना असे सांगीतले. पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांना स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे टेबलच्या ड्रावर मध्ये ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 श्रीमती ढवळे यांनी ड्रावर मधुन लाचेचे 12,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर सदर कक्षातील लाईट खिडक्या बंद करुन काळया कपडयाच्या सहायाने अंधार करुन श्री.जाधवर साहेबांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने पोलीस हवालदार प्रताप चव्हाण याचे हात, ड्रावर व लाचेच्या नोटा चेक केल्या असता पोलीस हवालदार प्रताप चव्हाण यांचे उजव्या हाताचे बोटावर, ड्रावरच्या आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर लाचेची रक्कम पंचा समक्ष लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आली. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता माझे डाव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर माझ्या कामकाजाच्या संदर्भाचे कागदपत्र ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर श्री.जाधवर साहेब, सापळा पथक, दोन्ही पंच, मी व पोलीस हवालदार प्रताप चव्हाण असे आम्ही अँन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

तरी आज दिनांक 03.09.2024 रोजी आलोसे प्रताप चव्हाण पोलीस हवालदार ब.न.1048 यांनी पोलीस स्टेशन अंबड येथे आमच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यात मदत व तपास लवकर करुन चार्जशीट कोर्टात दाखल करण्यासाठी यापुर्वी 3,000/-रुपये स्विकारल्याचे मान्य करुन बाकी राहिलेले 12,000/-रुपये लाचेची मागणी करुन स्वतः स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

मला लिहिता वाचता येत नसल्याने मी तोंडी सांगितलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मला वाचुन दाखविली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Raghunath Kaduba Nachan(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिकाऱ्याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पो.ठाणे अमलदार

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Raghunath Kaduba I

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI



Scanned with CamScanner